PlanetRead

Literacy for a Billion

Movie: Ranpakhare
Year:

Song: Sukun Geli Shej Fulanchi
Lyricist:

सुकून गेली शेज फुलांची
सुकला गजरा हार
थकले डोळे थकली काया
रूसला हा शिणगार
जीव झालायं येडापिसा
चाळ बोलेना पायी कसा
जीव झालायं येडापिसा
चाळ बोलेना पायी कसा
चाळ बोलेना पायी कसा
हो पायी कसा
हो पायी कसा
जीव झालायं येडापिसा
चाळ बोलेना पायी कसा

या रंगमहाली काल खेळले रंग
या रंगमहाली काल खेळले रंग
मी गौळण झाले भिजवी मला श्रीरंग
मी गौळण झाले भिजवी मला श्रीरंग
आज रंगाचा बेरंग असा
चाळ बोलेना पायी कसा
आज रंगाचा बेरंग असा
चाळ बोलेना पायी कसा

ही मदन बाग मी फुलं येचली काल
ही मदन बाग मी फुलं येचली काल
मी काटया वरती आज चालते चाल
मी काटया वरती आज चालते चाल
भिजं रक्तात पाऊल ठसा
चाळ बोलेना पायी कसा
भिजं रक्तात पाऊल ठसा
चाळ बोलेना पायी कसा

हटवादी मन हे पाय घेईना मागं
हटवादी मन हे पाय घेईना मागं
गुदमरून गेली कला अंगाची आग
गुदमरून गेली कला अंगाची आग
मासा तळमळ करतोय जसा
चाळ बोलेना पायी कसा
मासा तळमळ करतोय जसा
चाळ बोलेना पायी कसा
चाळ बोलेना पायी कसा
हो पायी कसा हो पायी कसा
जीव झालायं येडापिसा
चाळ बोलेना पायी कसा
हो चाळ बोलेना पायी कसा

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*